दाखले :

१ महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम, १९६६ चे कलम १८

२ महाराष्ट्र ग्रामपंचायत आणि महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना (सुधारणा) अधिनियम, २०१४ (सन २०१४ चा महाराष्ट्र अधिनियम क्र. ४३) तसेच महाराष्ट्र शासन ग्राम विकास विभाग, यांचे कडील शासन निर्णय क्रमांक : व्हिपीएम-२०१५/प्र.क्र.३९/पं.रा.-४, दि. ११ डिसेंबर, २०१५

३ म. जिल्हाधिकारी सो., नाशिक यांचे कडील आदेश क्र.मशा/कक्ष/३/८/काबि/८६/२०१६, दि. ०२.०२.२०१६

४ महाराष्ट्र शासन, उद्योग ऊर्जा व कामगार विभाग, कडील शासन परिपत्रक क्रमांक : बीसीए २००७/प्र.क्र. ७८८/कामगार ७-अ, दि. २६ ऑक्टोबर, २००९

५ महाराष्ट्र शासन, उद्योग ऊर्जा व कामगार विभाग, कडील शासन निर्णय क्रमांक : बीसीए २००९/प्र.क्र. १०८/कामगार ७-अ, दि. १७ जुन, २०१० नुसार बांधकाम कामगार कल्याण उपकर रक्कम रुपये ५५६३२/- **भरणा दि. ०३.०४.२०१८**

६ श्री. राजेंद्र बंडूजी खातळे व इतर तर्फे जनरल मुखत्यार के. बी. रोहमारे हौसिंग प्रा. लि. तर्फे संचालक श्री. अमित रोहमारे यांचा बांधकाम परवानगी मिळणे बाबतचा अर्ज दिनांक ०८/०१/२०१८

७ सहा.संचालक नगररचना विभाग नाशिक यांचेकडील पत्र जा.क्र.बांप/मौजे पिंप्रीसद्रोद्दीन, ता. इगतपुरी/ग.नं. ५५३/अ व इतर/ससंनरना/७४४, दि. २२.०३.२०१८

८ तहसिलदार इगतपुरी यांचे कडील पत्र क्रं.जमा-१/काबि/५०१/२०१७, दि. ०१.११.२०१७

९ मंडळ अधिकारी भाग इगतपुरी, ता. इगतपुरी, यांचेकडील स्थळनिरिक्षण अहवाल पत्र जावक क्रं. ८२/२०१७, दिनांक ०१/११/२०१७

उपविभागीय अधिकारी, इगतपुरी-त्र्यंबकेश्वर उपविभाग, नाशिक यांचे कार्यालय
क्र.जमाबंदी/बां. प. एस.आर./ ०४ /२०१८
नाशिक दिनांक : ०५ /०४/२०१८

आदेश

महाराष्ट्र जमिन महसुल अधिनियम १९६६ चे कलम ४१ व त्याखालील नियम, म.प्रा.नि. व नगररचना अधिनियम १९६६, म.प्रा.पं. अधिनियम आणि म. प्रा.नि. व नगररचना अधिनियम यामध्ये सुधारणा सन २०१४ चा अधिनियम क्रं. ४३ मधील तरतुदीनुसार मिळकत धारक **श्री. राजेंद्र बंडूजी खातळे व इतर तर्फे जनरल मुखत्यार के. बी. रोहमारे हौसिंग प्रा. लि. तर्फे संचालक श्री. अमित रोहमारे**, रा. विठ्ठल चरणी, कॉलेज रोड, ता. जि. नाशिक यांना त्यांच्या नांवे अधिकार अभिलेखात दाखल असलेल्या मौजे **पिंप्रीसद्रोद्दीन**, ता. **इगतपुरी**, येथील ग.नं. ५५३/अ पैकी ७९७० चौ.मी. ग.नं. ५५४/अ पैकी १२०३६.६८ चौ.मी. असे एकुण क्षेत्र २०,००६.६८ चौ. मी. पैकी भू.क्र. ९ क्षेत्र **३६३.३७ चौ.मी.** क्षेत्रास **रहिवास** या प्रयोजनासाठी बांधकाम परवानगी खालील अटी व शर्तीवर अनुज्ञेय करण्यात येत आहे.

अटी व शर्ती

१. सदरची परवानगी वाचले क्रंमाक १ ते ५ चे शासन निर्णय, अधिसूचना व नियमांना अधिन राहुन देण्यात येत आहे.

२. **सहा.संचालक नगररचना विभाग नाशिक यांचेकडील दि. २२/०३/२०१८ रोजीचे बांधकाम मंजुरी पत्रात नमुद अटी व शर्ती परवाना धारक यांचे वर बंधनकारक राहतील.**

३. सदरची परवानगी महाराष्ट्र जमिन महसुल अधिनियम, १९६६ चे कलम ४१ अन्वये देण्यात येत असुन उपरोक्त नमुद प्रयोजना व्यतिरिक्त इतर अकृषिक वापर आढळून आल्यास सदरची परवानगी रद्द समजण्यात येऊन नियमानुसार दंडात्मक कार्यवाही करण्यात येईल.

४. परवानाधारक यांनी सदरहु जमीन व त्यावरील बिल्डींग अथवा बांधकामाचा उपयोग ज्या कारणासाठी बांधकाम परवानगी दिली आहे, त्याच कारणासाठी करावा. तसेच सदरहु जमीनीचा किंवा सदरहु जमिनीपैकी काही भागाचा अथवा त्यावरील बिल्डींगचा अथवा बांधकामाचा उपयोग दुसऱ्या कारणासाठी करावयाचा झाल्यास यास उपविभागीय अधिकारी, इगतपुरी-त्र्यंबकेश्वर उपविभाग, नाशिक यांची लेखी पुर्व संमती घ्यावी याच कारणासाठी बिल्डींगचा उपयोग हा संपुर्ण जमीनीचा उपयोग म्हणून मानण्यांत येईल.

५. सदरहु परवानगी ही देखाव्याच्या नकाशामध्ये / प्लॅनमध्ये दाखविल्याप्रमाणे बांधावयाचे बिल्डींगप्रमाणे करण्यास देण्यांत येत आहे. प्लॅनमध्ये दाखविल्याप्रमाणे मोकळी जागा, रस्ते, इत्यादी जागेवर ठेवणे परवानाधारक यांचेवर बंधनकारक राहील. सदर अटीचे पालन न केल्यास सदरची परवानगी रद्द समजण्यात येईल.

६. परवानाधारक यांनी बिल्डींग व इ.बांधकामे पुर्ण केल्यानंतर त्यामध्ये वाढीव बांधकाम किंवा बांधकामामध्ये बदलपुर्व परवानगी शिवाय व सदरहु बांधकामाचे प्लॅन उपविभागीय अधिकारी/सहाय्यक संचालक नगररचना/महानगरपालिका/नगरपालिका यांचेकडुन मंजुर करुन घेतल्याशिवाय करु नये.

७. **परवानाधारक यांनी बांधकामासाठी लागणाऱ्या विटांमध्ये फ्लॉय ऍशद्वारे तयार करण्यांत आलेल्या विटांचा वापर नियमीतपणे करावा.**

८. परवानाधारक यांना मंजुर प्रादेशिक योजनेच्या विकास नियंत्रण व प्रोत्साहन नियमावलीतील नियम क्र. ६.२.११ नुसार शासन नियमानुसार सुरक्षा अनामत शुल्क भरणे आवश्यक आहे. तथापि, यासंदर्भात संयुक्त, Personal Ledger Account काढणेबाबत शासनाकडुन मार्गदर्शन प्राप्त होईपर्यंत "नियमानुसार सुरक्षा अनामत शुल्क भरण्यास बांधिल राहील," असे बंधपत्र/ प्रतिज्ञापत्र घेणेत आलेले असल्याने नियमानुसार सुरक्षा अनामत शुल्क भरणे परवानाधारक यांचेवर बंधनकारक राहील.

९. परवाना धारक यांचेवर पर्यावरण किंवा इतर विभागाचे नाहरकत दाखला घेणे /परवानगी घेणे आवश्यक असल्यास ते घेणे बंधनकारक राहील. तत्सम परवानगी किंवा नाहरकत दाखले परवानाधारक यांनी न घेतल्यास सदरची परवानगी रद्द समजण्यात येईल.

१०. सदर मिळकत हि समृध्दी महामार्गास समुंख असल्याने भविष्यात महाराष्ट्र रस्ते विकास महामंडळाकडून ठरविण्यात येणाऱ्या नियंत्रण रेषा व बांधकाम रेषा इत्यादीचे नियम हे परवानाधारक यांचे वर बंधनकारक राहतील सदर नियमावलीमुळे परवानाधारक यांचे बांधकाम काढून टाकावयास लागल्यास त्याची संपुर्ण जबाबदारी हि परवाना धारक यांची राहील या बाबत कोणत्याही प्रकारचा मोबदला परवानाधारक यांना मिळणार नाही.

वरीलपैकी कोणत्याही अटी व शर्तीचा तसेच प्रचलित कायदा व नियमांचा भंग झाल्यास व चौकशी अंती सत्यता आढळुन आल्यास सदरची परवानगी रद्द करण्यास पात्र राहील.

उपविभागीय अधिकारी इगतपुरी-त्र्यंबकेश्वर उपविभाग नाशिक
सत्यमेव जयते

(राहुल र. पाटील)
नियोजन प्राधिकारी (ग्रामीण) नाशिक करीता,
उपविभागीय अधिकारी,
इगतपुरी-त्र्यंबकेश्वर उपविभाग, नाशिक

प्रति,

श्री. राजेंद्र बंडूजी खातळे व इतर तर्फे जनरल मुखत्यार के. बी. रोहमारे हौसिंग प्रा. लि. तर्फे संचालक श्री. अमित रोहमारे,
रा. विठ्ठल चरणी, कॉलेज रोड, ता. जि. नाशिक